**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना तिमोर लेस्तेचा 'ग्रँड कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ तिमोर-लेस्ते' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुपीक आणि हवामानाला अनुकूल अशा जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रारंभ

- माजी परराष्ट्रमंत्री के. नटवरसिंग यांचं दीर्घ आजारानं निधन

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप, एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह पदक तालिकेत भारत ७१ व्या स्थानी

**<><><><><>**

फिजी, न्यूझीलंड आणि तिमोर लेस्ते या तीन देशांचा दौरा आटोपून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नवी दिल्लीला रवाना झाल्या आहेत. अंतिम टप्प्यावर, राष्ट्रपतींनी तिमोर लेस्तेला भेट दिली. तिथे त्यांना देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कार, असलेल्या 'ग्रँड कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ तिमोर-लेस्ते' या पुरस्कारानं सन्मानित केलं गेलं.

राष्ट्रपतींनी काल तिमोर लेस्तेची राजधानी 'डिली' इथं तिमोर-लेस्तेचे राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांनी परस्पर सहकार्यासाठी तीन सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. तिमोर-लेस्तेचे राष्ट्रपती जोस रामोस-होर्टा यांनी राष्ट्रपती मुर्मू यांच्या सन्मानार्थ मेजवानीचं आयोजन केलं होतं. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन्ही देशांमधले परस्पर संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला.

दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना तिमोर लेस्तेच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित केलं जाणं हा देशासाठी अभिमानाचा क्षण असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं आहे. अनेक वर्षांच्या सार्वजनिक जीवनातल्या मुर्मू यांच्या अतुलनीय योगदानाची ही एक ओळख असल्याचं मोदी यांनी नमूद केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत अत्यंत सुपीक आणि हवामानाला अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रारंभ केला. यात ३४ नगदी पिकं आणि २७ बागायती पिकं आहेत. यात भरडधान्य, तेलबिया, कडधान्य, ऊस, कपाशी, तृणधान्य यांसह भाज्या, फळं, कंदमुळं, मसाले, औषधी वनस्पती, फुलं अशा विविध पिकांचा समावेश आहे.

<><><><><>

सुदृढ आणि सशक्त लोकशाहीसाठी संवाद आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे, असं लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. काल नवी दिल्ली येथे नवनिर्वाचित संसद सदस्यांसाठी आयोजित केलेल्या दोन दिवसीय अभिमुखता कार्यक्रमाच्या समारोप सत्राला संबोधित करताना ते बोलत होते. भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे असं सांगून संसद सदस्यांना लोकशाही आचरणाची सर्वोच्च मूल्यं राखण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. संसद सदस्यांच्या कृती केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर पाळल्या जातात, त्यामुळे त्यांनी सन्मानाने, आणि सभ्यतेने वागलं पाहिजे, असंही ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

वक्फ दुरुस्ती विधेयक, २०२४ चं पुनरावलोकन करण्यासाठी स्थापन केलेली ‘जेपीसी’ अर्थात, संयुक्त संसदीय समिती, हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या

आठवड्याच्या शेवटच्या दिवशी लोकसभेला आपला अहवाल सादर करेल, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी काल सोशल मीडियावरील संभाषणादरम्यान, दिली. या प्रकरणाच्या सुनावणीची तारीख ही संसदीय समिती जाहीर करेल, मुस्लिमांसह, सकारात्मक योगदान देऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही संस्था किंवा व्यक्तींना या समितीच्या कामकाज प्रक्रियेत सहभागी होता येईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने काल टी. व्ही. सोमनाथन यांची कॅबिनेट सचिव म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिली. सोमनाथन यांची या महिन्याच्या ३० तारखेपासून दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. ते भारतीय प्रशासकीय सेवेच्या तामिळनाडू केडरच्या १९८७च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. सोमनाथन यांची कॅबिनेट सचिवालयातले विशेष कार्यअधिकारी म्हणून नियुक्तीलाही मान्यता दिली गेली आहे.

<><><><>

नीट पदव्यूत्तर प्रवेश परीक्षा आज होत आहे. नॅशनल मेडिकल सायन्स एक्झामिनेशन बोर्ड दोन सत्रांमध्ये ही परीक्षा घेणार आहे. सुमारे दोन लाखांहून अधिक विद्यार्थी प्रवेश परीक्षेला बसले आहेत. जूनमध्ये परीक्षेच्या नियोजित तारखेच्या एक दिवस आधी ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. स्पर्धा परीक्षांवर झालेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला होता.

<><><><>

सेबीच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांनी अमेरिकेतल्या हिंडेनबर्ग या गुंतवणूक आणि संशोधन संस्थेनं केलेले आरोप फेटाळले आहेत. बुच दांपत्याचा अदानी समुहाशी संबंधित ऑफ-शोअर संस्थांमध्ये सहभाग असल्याचा आरोप हिंडनबर्गनं केला होता. यासंदर्भात धवल बुच यांनी एक

निवेदन जारी केलं असून, आपल्या उत्पनाविषयीची माहिती सार्वजनिक असल्याचं म्हटलं आहे. यासंदर्भातली आवश्यक कागदपत्र याआधीच सेबीकडे जमा करण्यात आली असल्याचं त्या निवेदनात म्हटलं आहे. आपल्या आर्थिक कागदपत्रांसह इतर दस्तऐवजांची चौकशी करण्याला हरकत नसल्याचंही त्यांनी निवेदनातून स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड--बाईट - मृणाल कुलकर्णी ( २३ सेकंद)**

**<><><><><>**

माजी परराष्ट्र मंत्री के. नटवर सिंग यांचं काल रात्री दिल्लीजवळच्या गुरुग्राममध्ये दीर्घ आजारानं निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. काही काळ त्यांची तब्येत बरी नव्हती. त्यांच्या पार्थिवावर आज दिल्लीत अंत्यसंस्कार होणार असल्याचं त्यांच्या कौटुंबियांनी सांगितलं. नटवर सिंह यांचा जन्म १९३१ मध्ये राजस्थानच्या भरतपूर जिल्ह्यात झाला. १९८४ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. नटवर सिंग यांनी अनेक पुस्तकंही लिहिली आहेत.

माजी परराष्ट्र मंत्री नटवर सिंग यांच्या निधनाबद्दल उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. सिंग हे एक उत्तम लेखक होते आणि त्यांच्या योगदानासाठी ते कायम स्मरणात राहतील, असं उपराष्ट्रपतींनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं आहे, तर परराष्ट्र धोरण आणि

जागतिक मुत्सद्देगिरीमध्ये सिंग यांनी भरीव योगदान दिल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा समारोप आज होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता हा समारोपाचा समारंभ सुरू होईल. सुमारे ८० हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत स्टेड दे फ्रान्स स्टेडिमयममध्ये हा कार्यक्रम पार पडेल. दोनवेळा ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज मनू भाकर आणि हॉकी संघाचा गोलकीपर पी. आर. श्रीजेश या कार्यक्रमात भारताचे ध्वजधारक असतील. समारोपाच्या वेळी ऑलिम्पिक ज्योत समारंभपूर्वक शांत केली जाईल आणि पुढच्या, २०२८ ऑलिम्पिकच्या लॉस अँजेलिस व्यवस्थापन समितीकडे ऑलिम्पिकचा ध्वज सुपूर्द केला जाईल. सध्याच्या पदकतालिकेत भारत एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह ७१व्या स्थानावर आहे. चीन पहिल्या, अमेरिका दुसऱ्या, तर ऑस्ट्रेलिया तिसऱ्या स्थानावर आहे.

दरम्यान, भारतासाठी पहिलंवहिलं वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारा नेमबाज अभिनव बिंद्रा याला काल आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या कार्यक्रमात प्रतिष्ठित ऑलिम्पिक ऑर्डर पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट हिला अपात्र ठरवण्याच्या निर्णयाविरोधात तिनं दाखल केलेल्या याचिकेवर निकाल द्यायला ऑलिम्पिक क्रीडा लवादचा निकाल १३ ऑगस्ट रोजी येण्याची शक्यता आहे.

<><><><>

कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २०२३ सालाकरता प्रति हेक्टर पाच हजार रुपये अर्थसहाय्य द्यायची शासनाची योजना आहे. त्याकरता पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या आधार आणि बँक खात्याशी संलग्न असलेल्या माहितीचा वापर करू देण्यासंदर्भातलं त्यांचं वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत पत्र

आपल्या कृषी सहाय्यकाकडे जमा करणं आवश्यक आहे, असं कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधील आनंतनाग जिल्ह्यातील कोकरनाग भागात दहशतवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत दोन जवान शहीद झाले. चकमकी दरम्यान, गंभीर जखमी जवानांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. संरक्षण विभागाच्या प्रवक्त्यांनी ही माहिती दिली. या चकमकीत दोन नागरिकही जखमी झाले.

**<><><><><>**

बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे नेते, नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस यांनी देशातल्या अल्पसंख्याक समुदायांवरील हल्ल्यांचा निषेध केला आहे. सर्व हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्ध अल्पसंख्यांकांचं संरक्षण करायला हवं, असं आवाहन त्यांनी आंदोलनकर्त्यांना केलं.

**//<><><><><>//**